# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्र. : २५६०११८९/९०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३८८
संकेतस्थळ : www.unipune.ac.in

**आरक्षण कक्ष**
गणेशखिंड, पुणे - ४११००७.
ई-मेल: arakshan_ar@unipune.ac.in

संदर्भ क्र.:- आरक्षण /ओ-२२/ 1799

दिनांक : 22/12/15

प्रति,
मा.प्राचार्य/मा.संचालक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था.

विषयः- अंध व क्षीणदृष्टी उमेदवारांना परीक्षेसाठी जॉज (JAWS) किंवा लेखा (LEKHA) किंवा तत्सम या संगणक प्रणाली उपलब्ध करून देण्याबाबत.

संदर्भः- १. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे संदर्भ पत्र क्रमांक- उशिसं/२०१५/अपंग/मवि-१/१२०३४, दिनांक २०/११/२०१५.
२. मा.कार्यासन अधिकारी, उच्च तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांचे दिनांक २७/१०/२०१५ रोजीचे पत्र.
३. शासन परिपत्रक क्रमांक न्यायाप्र-२०१५/ प्र.क्र.०१/ अ.क.२, दिनांक १४/०८/२०१५

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भीय शासन परिपत्रकास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, मा. सहसंचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक २०/११/२०१५ रोजीचे पत्र व सदर पत्रासोबत संदर्भ पत्र क्रमांक ०२ व संदर्भ क्रमांक ०३ पुढील योगत्या कार्यवाहीकरीता सोबत जोडत आहे. संदर्भ क्रमांक ०३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे सूचनांचे तंतोतंत पालन करावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासु,

22/12/15

उपकुलसचिव
(आरक्षण कक्ष)

**सोबतः- वरीलप्रमाणे**

1\G:\2014\Circulars.docx

# महाराष्ट्र शासन
## उच्च शिक्षण संचालनालय
### महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं. ०२० / २६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९. फॅक्स नं.- ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/२०१५/अपंग/मवि-१ (12034) दि.- १९.११.२०१५

प्रति,

१) विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण, सर्व विभाग.

२) कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

विषय :- अंध व क्षीणदृष्टी उमेदवारांना परिक्षेसाठी जॉज ( JAWS ) किंवा लेखा ( LEKHA ) किंवा तत्सम या संगणक प्रणाली उपलब्ध करून देण्याबाबत.

संदर्भ:- १. शासन पत्र क्र. संकीर्ण- २०१५/१५९९/ प्र.क्र. ३७६/मशि-२ , दि.२७.१०.२०१५
२. शासन परिपत्रक क्र. न्यायाप्र-२०१४/प्र.क्र.०१/अ.क.२,दि.१८.०३.२०१४
३. शासन परिपत्रक क्र. न्यायाप्र-२०१५/प्र.क्र.०१/अ.क.२,दि.१४.०८.२०१५

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय शासन पत्र व संदर्भ क्र.३ च्या परिपत्रकाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. ( प्रत संलग्न ) दृष्टीहीन , अल्पदृष्टी , अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सी आणि डिस्लेक्सियाने बाधित झालेल्या व्यक्ती लिहीण्यासाठी सक्षम नसलेल्या परिक्षा प्रयोजनार्थ त्यांच्या मागणी प्रमाणे लेखनिक व अन्य बाबी उपलब्ध करुन देण्याबाबत सूचना उपरोक्त संदर्भ क्र.२ च्या परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या होत्या.

महाराष्ट्र राज्यामध्ये सर्व नियोक्ता प्राधिकाऱ्यांनी परिक्षेच्या वेळी अंध / क्षीणदृष्टी उमेदवारांच्या निवडीसाठी जॉज (JAWS) व लेखा ( LEKHA) किंवा तत्सम प्रणाली उपलब्ध करुन देण्याबाबत रिट याचिका क्र.१९५५/२०१४ या प्रकरणात मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या सूचना उपरोक्त संदर्भ क्र.३ च्या परिपत्रकात अंतर्भूत करण्यात आलेल्या आहेत. या परिपत्रकाची प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव सर्व कार्यालयांच्या निदर्शनास आणण्यात यावी असे शासनाचे निर्देश आहेत.

उपरोक्त परिपत्रकाच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्यात यावी. तसेच आपल्या अधिनस्त सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालये तसेच महाविद्यालयांना माहितीस्तव सदर शासन परिपत्रक उपलब्ध करून देण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करावा.

(डॉ.व्ही. आर. मोरे )
सहसंचालक
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य , पुणे- १

प्रत- मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रशासन शिक्षकेतर कक्ष 15 DEC 2015 आवक क्र. 13021 सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (पूर्वीचे पुणे विद्यापीठ) परीक्षा नियंत्रक कार्यालय आवक दिनांक 24 NOV 2015 आवक/जावक क्रमाक-पनि/ 2521 जावक दिनांक 26.11.15

20 NOV 2015 मा. कुलसचिव यांचे कार्यालय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (पूर्वीचे पुणे विद्यापीठ) आवक /क्र.आर/ 4739 दिनांक - 20/11/2015 जावक दिनांक - 24/11/2015 विभाग - COE

आरक्षण कक्ष सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-४११ ००७. आवक क्र. - 1730 दिनांक- 21-12-15 विभाग-

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परीक्षा - समन्वय कक्ष दिनांक 30 NOV 2015 आवक क्र. 3023

शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१. - 3 NOV 2015 आवक क्रमांक:- 22083 शाखा:- प्रशा.2

महाराष्ट्र शासन

क्रमांक : - संकीर्ण - २०१५/१५१९/प्र.क्र.३७६/मशि-२
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मदाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २७ ऑक्टोबर, २०१५.

प्रति,

संचालक, उच्च शिक्षण, मवि-9 4/11/15
महाराष्ट्र राज्य,
पुणे.

**विषय :-** अंध व क्षीणदृष्टी उमेदवारांना परिक्षेसाठी जॉज ( JAWS) किंवा लेखा (LEKHA) किंवा तत्सम या संगणक प्रणाली उपलब्ध करुन देण्याबाबत.

**संदर्भ :-** कक्ष अधिकारी , आस्था -२ यांचे पृष्ठांकन क्रमांक : संकीर्ण -२०१५/ प्र.क्र.१८४-२०१५/आस्था-२ ,दि.१९/१०/२०१५.

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन पृष्ठांकनाची छायाप्रत सहपत्रासह सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

२. अंध व क्षीणदृष्टी उमेदवारांना परिक्षेसाठी जॉज ( JAWS) किंवा लेखा (LEKHA) किंवा तत्सम या संगणक प्रणाली उपलब्ध करुन देण्याबाबत या विषयाचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्र. न्यायाप्र-२०१५/प्र.क्र.०१/अ.क.२. दि.१४/०८/२०१५ रोजीच्या शासन परिपत्रकाची प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव, आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांच्या/ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

सोबत : वरीलप्रमाणे.

(प्रशा-2) 3/11/15

उर्मिला जोशी
**( उर्मिला जोशी )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत माहितीस्तव:-**

कक्ष अधिकारी, आस्था-२ , उच्च व तंत्र शिक्षण विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मदाम कामा रोड,मंत्रालय, मुंबई यांना संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने अग्रेषित.

म. वि.-9 शाटेकडे करावे.
5/11/15

श्री. चौगुले
7/11/15.

F:\BPED NAGARE\२०१५\Astha & Samnvya\Letter.docx/२४९

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
कार्यासन
दिनांक
0 AUG 2015
7528
25/8/15

१२४४/का-२
३१/८/२०१५

3

अंध व क्षीणदृष्टी उमेदवारांना परिक्षेसाठी जॉज (JAWS) किंवा लेखा (LEKHA) किंवा तत्सम या संगणक प्रणाली उपलब्ध करुन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक :- न्यायाप्र -२०१५/प्र.क्र.०१ /अ.क.२,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- १४ ऑगस्ट,२०१५

वाचा :- १) अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग ) अधिनियम १९९५
२) शासन परिपत्रक क्रमांक :- न्यायाप्र -२०१४/प्र.क्र.०१ /अ.क.२, १८ मार्च, २०१४
३) रिट याचिका (लॉजिंग) क्र.१९५५/२०१४ -संतोष प्रजापती विरुध्द महाराष्ट्र शासन व इतरबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे दि. २१ जुलै,२०१५ चे आदेश

प्रस्तावना-: अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील कलम क्र.५ व ६ नुसार अपंग व्यक्तींना शालेय, महाविद्यालयीन, पूर्व प्रवेश परिक्षा तसेच स्पर्धा परिक्षेसाठी लेखनिक उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यानुसार संदर्भाधिन क्र. २ येथील दिनांक १८ मार्च, २०१४ च्या शासन परिपत्रकान्वये सर्व संबंधित प्राधिकाऱ्यांना दृष्टीहीन, अल्पदृष्टी, अस्थिव्यंग,सेरेब्रल पाल्सी आणि डिस्लेक्सियाने बाधित झालेल्या व्यक्ती लिहीण्यासाठी सक्षम नसल्यास परिक्षा प्रयोजनार्थ त्यांच्या मागणीप्रमाणे लेखनिक व अन्य बाबी उपलब्ध करुन देण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. महाराष्ट्र राज्यामध्ये सर्व नियोक्ता प्राधिकाऱ्यांनी परिक्षेच्या वेळी अंध/क्षीणदृष्टी उमेदवारांच्या निवडीसाठी जॉज (JAWS) किंवा लेखा (LEKHA) किंवा तत्सम या संगणक प्रणाली (Software) उपलब्ध करुन देण्याबाबत रिट याचिका क्र. (लॉजिंग) क्र.१९५५/२०१४ -संतोष प्रजापती विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर ही याचिका मा. उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. सदर न्यायालयीन प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दि.२१.७.२०१५ रोजीच्या आदेशान्वये दिलेल्या सूचना दि.१८ मार्च,२०१४ च्या शासन परिपत्रकात अंतर्भूत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक -: दृष्टीहीन, अल्पदृष्टी, अस्थिव्यंग,सेरेब्रल पाल्सी आणि डिस्लेक्सियाने बाधित झालेल्या व्यक्ती लिहीण्यासाठी सक्षम नसल्यास परिक्षा प्रयोजनार्थ त्यांच्या मागणीप्रमाणे लेखनिक व अन्य बाबी बाबत उपरोक्त संदर्भाधीन क्र. २ येथील शासन परिपत्रक दि.१८ मार्च,२०१४ अन्वये देण्यात आलेल्या सूचना कायम असून, अंध /क्षीणदृष्टी उमेदवारांना संगणक प्रणाली (Software )उपलब्ध करुन देण्याबाबत न्यायालयीन निर्देशानुसार सदर शासन परिपत्रकात खालील बाबीं नव्याने अंतर्भुत करण्यात येत आहेत:-

१) महाराष्ट्र राज्यामध्ये सर्व प्रकारच्या परिक्षा-चाचणी परिक्षेच्या वेळी अंध व क्षीणदृष्टी विदयार्थी/ उमेदवारांना नियोक्ता /संबंधित प्राधिकाऱ्यांनी जॉज (JAWS) किंवा लेखा (LEKHA) किंवा तत्सम संगणक प्रणाली (Software) उपलब्ध करुन दयावी.

२) तसेच नियोक्ता/संबंधित प्राधिकाऱ्यांनी परिक्षेच्या वेळी कोणती संगणक प्रणाली( Software) उपलब्ध करुन देण्यात येणार आहे याबाबत उमेदवारांना आगाऊ माहिती दयावी.

२. सदर शासन परिपत्रक संबंधित मंत्रालयीन विभागांनी आपल्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख तसेच महामंडळे, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, मंडळे, सार्वजनिक उपक्रम व सर्व प्रकारच्या शैक्षणिक संस्था यांच्या तसेच शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, कृषी,पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, वैदयकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच आयुक्त (समाज कल्याण),संचालक (विजा/भज,इमाव व विमाप्र कल्याण),

आयुक्त (अपंग कल्याण) यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील शैक्षणिक व सर्व प्रकारच्या संस्था यांना तातडीने पाठवावे आणि वरील सूचनांचे तंतोतंत पालन करण्याच्या सूचना त्यांना द्याव्यात, असेही आदेश देण्यात येत आहेत.

३. सदरहू परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१५०८१४१३२६४०४७२२ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(उज्ज्वल उके)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति :-
मा. राज्यपाल यांचे सचिव,राजभवन, मलबार हिल, मुंबई,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
सर्व मंत्री / राज्यमंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधान सभा, विधान भवन, मुंबई,
मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधान परिषद, विधान भवन, मुंबई,
मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागांचे अमुस /प्र.स./सचिव,
प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त, महसूल विभाग,
संचालक, नगरपालिका प्रशासन, वरळी, मुंबई,
आयुक्त, सर्व महानगरपालिका,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
महासंचालक, बार्टी, पुणे
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
सर्व प्रादेशिक उप आयुक्त, समाजकल्याण,
सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण
सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,
महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखा लेखापरीक्षा), मुंबई /नागपूर
महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय मुंबई (५ प्रती प्रसिध्दीसाठी)
सर्व कार्यासने ,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय, मुंबई
सचिव, नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड ११/१२ खान अब्दुल गफारखान रोड, वरळी सीफेस, मुंबई-२५
निवड नस्ती /अपंग कल्याण-२